महत्वाचे

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# मुंबई विभागीय मंडळ, वाशी नवी मुंबई - ४०० ७०३

**परिपत्रक क्र.मुंविमं/उ.मा.प./फेब्रुवारी - मार्च-२०२३/गुणपत्रिका /1043-दिनांक 31/05/२०२३**

**विषय :- फेब्रुवारी-मार्च-२०२३ इ.१२ वी परीक्षेचे निकालाच्या गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत.**

**संदर्भ :- क्र.रा.मं./परीक्षा-२/ २२०५ , दि. २४ /०५ /२०२३.**

मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्य. शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उच्च माध्य. प्रमाणपत्र **फेब्रुवारी-मार्च-२०२३ परीक्षेस** प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची मूळ **गुणपत्रके (Marksheet), अभिलेखाची यादी ( कन्सोलिडेटेड कॉलेज रजिस्टर ) व स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) सोमवार, दिनांक ०५ /०६ /२०२३ रोजी नियोजित वितरण केंद्रावर सकाळी ११.०० वाजता** वाटप करण्यात येणार आहे. वितरण केंद्रावर आपला प्रतिनिधी वरीलप्रमाणे साहित्य स्विकारण्यासाठी स्वतंत्र अधिकारपत्रासह पाठविण्याची व्यवस्था करावी. **विद्यार्थ्यांना त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता गुणपत्रिकांचे वाटप आपणांमार्फत करावयाचे असल्याने गुणपत्रिका वेळेत घेवून जाणे बंधनकारक राहील.**

तसेच गुणपत्रके आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची असल्याची खात्री करून प्रविष्ट विद्यार्थी संख्येनुसार आहेत किंवा नाही याची खातरजमा करावी. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या असलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा गुणपत्रिकांची संख्या कमी अथवा जास्त असल्यास, अन्य कनिष्ठ महाविद्यालयाची असल्यास, तसेच गुणपत्रिका खराब असल्यास अथवा त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास गुणपत्रिका वाटपाच्या तारखेपासून **०७ दिवसाच्या** आत या विभागीय मंडळास लेखी निदर्शनास आणावे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत प्राप्त त्रुटी लक्षात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**फेब्रुवारी-मार्च-२०२३ परीक्षेस श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरित केल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयामार्फत मंडळास विकल्प देणे अनिवार्य आहे. तद्नंतर विकल्पासह जादा शुल्क आकारून सहा महिन्यापर्यंत गुणपत्रिका देण्यात येईल. सहा महिन्यापर्यंत विकल्प न दिल्यास श्रेणीसुधारची गुणपत्रिका रद्द करून पूर्वीचीच गुणपत्रिका ग्राह्य धरण्यात येईल.** गुणपत्रिका दिल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी असला तरीही आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातुन श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ठ झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्वरित संपर्क साधून लवकरात लवकर विकल्प देण्याबाबत कळविण्यात यावे त्याचप्रमाणे तशी लेखी नोंद आपल्या दप्तरी जतन करून ठेवावी. जेणेकरून भविष्यात श्रेणीसुधार योजनेतंर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

त्याचप्रमाणे सदर गुणपत्रिकांसोबत **फेब्रुवारी-मार्च-२०२३ परीक्षेच्या** विद्यार्थ्यांची **Inspire Award Certificates** कनिष्ठ महाविद्यालयाकडे देण्यात येत आहेत. सदर **Inspire Award Certificates** आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात यावीत व दिल्याची नोंद आपल्या दप्तरी ठेवावी. जेणेकरून याबाबत कोणतीही तक्रार मंडळ कार्यालयात येणार नाही.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३.

Manisha/paripatrak 2022

Scanned with OKEN Scanner